सुधीर फडके यांचे निधन

पान १ वरून ➤ भरविण्यात येत असे. स्वतंत्ररीत्या गाण्यांना चाली बांधणे आणि त्याचे गायन करणे याचा अनुभव त्यांना याच मेळ्यात मिळाला. याच काळात न. ना. देशपांडे यांनी रामचे नामकरण करून 'सुधीर' असे नाव ठेवले. १९३६ मध्ये त्यांच्या वडिलांचे निधन झाले.

वडिलांच्या मृत्यूनंतर घराचा खर्च चालविण्यासाठी त्यांना फार मेहनत करावी लागली. याच काळात मुंबईच्या मुक्कामात त्यांचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंध आला आणि तो तहहयात राहिला. त्या काळात ते संघाच्या कार्यालयात मुक्कामास होते. नंतर काही कारणास्तव त्यांना आपला मुक्काम तेथून हलवावा लागला. नंतर पोटापाण्यासाठी त्यांनी अनेक उद्योग करून बघितले. कष्ट जास्त आणि मिळकत नगण्य. खाण्यापिण्याची आबाळ होऊ लागल्याने अशक्तपणा वाढला, ताप येऊ लागला. त्यांना क्षयाची बाधा झाल्याचे तपासणीत निष्पन्न झाले. मुंबई सोडून कोरड्या हवेत राहण्यास जावे या मित्रांच्या सल्ल्याने त्यांनी मुंबई सोडली.

गावोगाव गाण्याचे कार्यक्रम करीत ते थोडेफार पैसे मिळवू लागले. नाशिक, मालेगाव, अमळनेर, धुळे तसेच मध्य प्रदेश, बिहार, कलकत्ता, दिल्ली, राजस्थान, पंजाब येथेही त्यांनी गाण्याचे कार्यक्रम केले. याच काळात विविध प्रांतांची लोकगीते आणि लोकसंगीत यांचा अभ्यास त्यांना करायला मिळाला. गया येथे त्यांच्या गायनाने प्रभावित झालेल्या पुजाऱ्याने देवीचा हार त्यांच्या गळ्यात घातला.

बाबूजींचा 'प्रभात' काल

११ फेब्रुवारी १९४६ हा बाबूजींच्या आयुष्यातील भाग्याचा दिवस! प्रभात फिल्म कंपनीच्या साहेबमामा फत्तेलाल यांनी त्यांना संगीत दिग्दर्शक पदासाठी निवडले आणि 'गोकुल' या चित्रपटाच्या संगीताची जबाबदारी सोपवली. अत्यंत अननुभवी असलेल्या बाबूजींनी 'गोकुल'पाठोपाठ 'रुक्मिणी स्वयंवर' (१९४६), 'आगे बढो' (१९४७), 'सीता स्वयंवर' (१९४८), 'अपराधी' (१९४९) या चित्रपटांतील गीतांना अत्यंत मनमोहक चाली लावल्या. या चित्रपटांमधील अनेक गाणी त्याकाळी रसिकांना डोलावून गेली. 'प्रभात'मध्ये संगीत दिग्दर्शक म्हणून झालेल्या चाचणीत बाबूजींनी लावलेल्या चालींमुळे सर्वजण बेहद्द खूश झालेच, पण मा. कृष्णरावांची खोली त्यांना राहण्यासाठी दिली. केशवराव भोळे, गोविंदराव टेंबे या दिग्गज संगीत दिग्दर्शकांच्या गादीवर बसून बाबूजींनी चित्रपट संगीताची परंपरा उच्च स्थानावर नेऊन ठेवली. किंबहुना जास्त उंचावली. चित्रपट संगीताच्या विश्वावरही सुधीर फडके यांनी सलग तीन तपे अधिराज्य गाजवले. 'वंदे मातरम्'पासून प्रारंभ झाल्यानंतर हा माझा मार्ग एकला, लाखाची गोष्ट, जगाच्या पाठीवर, सुवासिनी, प्रपंच अशा एकाहून एक श्रुतिमधुर चित्रपटांना सुधीर फडके यांच्या प्रतिभेचा स्पर्श झाला होता. 'ज्योती कलश छलके' ह्या हिंदी गीतासाठी सुधीर फडके यांना 'सूर सिंगार' पुरस्कार प्राप्त झाला आणि त्यांच्या एकूण सांगीतिक कामगिरीबद्दल तर संगीत नाटक अकादमीचा दुर्लभ पुरस्कार सुधीर फडके यांना राष्ट्रपतींच्या हस्ते बहाल करण्यात आला.

संगीतसेवेबरोबरच सुधीर फडके यांनी राष्ट्रीय भावनेने देशहिताच्या केलेल्या कामाचे मोल अजोड आहे. १९३० साली वीर सावरकरांच्या दर्शनानंतर सुधीर फडके यांच्या मनात राष्ट्रप्रेमाची ज्योत सदैव तेवत राहिली. धुळे जिल्ह्यात संघप्रचारक म्हणून त्यांनी काम केले. नंतर दादरा-नगरहवेली ह्या पोर्तुगीजव्याप्त टापूची पाहणी करून २५ सशस्त्र कार्यकर्त्यांसह नगरहवेलीवर चाल केली. ३१ जुलै १९५४ रोजी त्यांनी सिल्व्हासा ह्या पोर्तुगीजांच्या ठाण्यावर भारताचे निशाण दिमाखात फडकावले. गोमंतक स्वातंत्र्य लढ्यातील सैनिक मोहन रानडे आणि तेलु मस्कारान्हेस ह्यांची पोर्तुगीज तुरुंगातून सुटका होण्यासाठी त्यांनी केलेल्या अथक प्रयत्नांचे चीज झाले. एका दलित भगिनीवर अत्याचार झाला, त्याच्या निषेधार्थ सुधीर फडके हुतात्मा चौकात उपोषणाला बसले, इतक्या त्यांच्या सामाजिक जाणिवा तीव्र होत्या. ■